**नमुना दोन (२)**

**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर**
(मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, तामिळ इ. माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग

जा. क्र. शि.ख्या.प्रा.शा. २/२०७/१८
पुणे १ दिनांक - ०७/०७/२०१८

प्रति,
अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशनल अकॅडेमी, अंबी संचलित,
डी. वाय. पाटील हायस्कूल,
अंबी, तळेगाव-दाभाडे, पुणे.

**विषय :- बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याचा नियम ११, पोटनियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत...**

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे मी **शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पुणे** दिनांक **१ एप्रिल २०१८ पासून दिनांक ३१ मार्च २०२१** पर्यंतच्या कालावधीसाठी इयत्ता १ ली ते ८ वी करिता **डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशनल अकॅडेमी, अंबी संचलित, डी. वाय. पाटील हायस्कूल, अंबी, तळेगाव-दाभाडे, पुणे.** यांना तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे. :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणी इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणी महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ जोडपत्र (दोन) मधील तरतूदीचे, शाळा, पालन करील.

३. शाळांना नजीकच्या दूर्बल घटकातील आणी वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणी प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल. परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ठ केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणी कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकास किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही;
(दोन) कोणत्याही बालकांस शारिरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होइपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल;
(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकाची नियुक्ती करण्यात येईल. परंतू आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षांच्या कालावधीत संपादन करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील; आणि
(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेवू नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्यावेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे आहेत.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- **४०४६८ चौ.मी.**
- एकूण बांधकामाचे क्षेत्र :- **३३४५ चौ.मी.**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ :- **६०५८ चौ.मी.**
- वर्गखोल्यांची संख्या :- **२०**
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली :- **०१**
- मुलांसाठी व मूलांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे आहेत काय?

| | मूले | मूली |
|---|---|---|
| **संडास** | ०८ | ०८ |
| **मुताऱ्या** | ०८ | ०८ |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा : **आहे**
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर :- **लागू नाही**
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडा विषयक सामग्री ग्रंथालय उपलब्ध :- **आहे**
- वाचनसाहित्य विनासायास उपलब्ध :- **आहे**

**पुस्तक संख्या - २२५७**
**नियतकालिके - १६**
**वर्तमानपत्रे - ०५**

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता वि... कोणताही नफा मिळवण्यासाठी चालविण्यात येत नाहीत.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखपालाकडून लिखापरिक्षित व प्रमाणीत करून घ्यावेत आणी नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारीकडे पाठवण्यात यावी.

१६. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे;

१७. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

पचायत समिती मावळ
जा.क्र.पंस/आस्था/शिक्षण/ ९३३/२०१८
वडगाव दि. ०६/०५/२०१८

आपला विश्वासू,

गट शिक्षणाधिकारी
ग. शि. अ. पं. स. मा.

जिल्हा शिक्षणाधिकारी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे